मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.पा./न.प./प.प.
आवक क्र. २५
दिनांक:- ११/०५/2022

## केंद्र शासनाचा महिती अधिकार-2005

नमूनपत्र-3

प्रति,
मा. महिती अधिकारी
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.
भाईंदर (प.)

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आवक क्र. ९४३ (मा.अ.)
दाखल दि. १०/०५/२२
आयुक्त
मि.भा.म.न.पा

अर्जदार: प्रमोद जयराम सामंत
ई २, हार्मोनी ऑफिस, सेक्टर ७, शांतीनगर,
मीरारोड (पूर्व),जिल्हा ठाणे. 401107.
भ्रमणध्वनि – 09821063162

माहितीचा विषय : अटल नवीकरण और शहरी परिवर्तन मिशन (Amrut) योजना बाबत.

माहितीचा तपशिल :

1) अटल नवीकरण और शहरी परिवर्तन मिशन (Amrut) योजने संदर्भात २०१४ पासून आजपर्यंत मा. महासभा व मा. स्थायी समिती मध्ये झालेल्या ठरावांची प्रत देण्यात यावी.

माहिती : व्यक्तिशा मिळावी
ठिकाण : मीरा रोड
दिनांक : १०/०५/२०२२

आपला

(प्रमोद जयराम सामंत)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२५ /2022 दिनांक :- २८ / ५ /2022

प्रति,
श्री. प्रमोद सामंत,
ई2, हार्मोनी आफीस, सेक्टर ७,
शांतीनगर, मिरारोड (पू.)

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
अटल नवीकरण आणि शहरी परिवर्तन मिशन (Amrut) योजनाबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 11/05/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, अटल नवीकरण आणि शहरी परिवर्तन मिशन (Amrut) योजनेबाबत मा. महासभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये पारित ठरावांच्या प्रतींची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 01/07/2015 ठराव क्र. 11, मा. महासभा दि. 22/07/2015 ठराव क्र. 37 व मा. स्थायी समिती सभा दि. 24/08/2018 ठराव क्र. 61 च्या साक्षांकित प्रती आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 05)

उक्त कागदपत्रांसाठी लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- या प्रमाणे एकूण 05 पानांकरिता रुपये 10/- (अक्षरी रुपये दहा मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०७/२०१५

**प्रकरण क्र. ३२ :- भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी "आदर्श वॉर्ड योजना" राबविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र. :-** ११

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या "आदर्श वार्ड योजना" करीता रु.१०.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. सदर योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वार्डची निवड करून सदर वार्डातील सर्व मूलभूत सोयी सुविधा तसेच विकास कामे पूर्ण करून सदर आदर्श वॉर्ड तयार करावयाचा आहे. सदर काम करण्यासाठी वार्डाची निवड करून अनुभवी सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत सदर वॉर्डातील करावयाच्या कामांबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केल्यास सदर वार्ड हा चांगल्या प्रकारे विकसित करून घेता येईल.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) व प्रभाग क्र. १२ (भागशः) मध्ये भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी "आदर्श वार्ड योजना" राबविणेस व सदर कामासाठी अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) मध्ये रु.७.०० कोटी व प्रभाग क्र. १२ (भागशः) मध्ये रु.३.०० कोटी रक्कमेची कामे करण्यासाठी खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर वॉर्ड आदर्श वॉर्ड तयार करण्यासाठी सदर प्रभागातील खालील कामांचा प्रकल्पात समावेश करण्यात यावा.

झाडे लावणे, फुटपाथ, टाईल्स, काँक्रीट रस्ते, डांबरी रस्ते तयार करणे, प्रभागातील दुकानांची छपरे काढणे, फेरीवाले ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करणे, डी.पी. प्रमाणे रस्ते रुंदीकरण करणे, किती फेरीवाले कुठे बसवावे याबाबतचे नियोजन करणे, मार्केट, उद्यान, मैदान, बस स्टॉप, शौचालये, स्टॉल, गटारे बांधणे, रस्त्यांवरील सर्व युटीलिटी स्थलांतरीत करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा डब्बे बसविणे, अतिक्रमण हटविणे, पार्कींग नो पार्कींग क्षेत्र ठरविणे, गतिरोध, नामफलक, दिशा दर्शक फलक, स्टॉल डिझाईंन करणे, होर्डींग्ज, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, स्वच्छता चौकी, तक्रार निवारण कक्ष तयार करणे, विना परवाना दुकान बंद करणे, सर्व दुकानदारांनी परवानगी घेणे, फायर हायड्रंट सिस्टीम बसविणे, सिव्हरेज जोडणी, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे व इतर कामे करणे या आदर्श प्रभागात १००% काम पूर्ण करण्यात यावीत. आदर्श वार्ड म्हणून कामे करावयाच्या वार्ड मधील रस्त्यात बाधित अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण हटविल्यानंतरच आदर्श वॉर्ड तयार करण्याची प्रक्रीया सुरु करण्यात यावी. तसेच ७.०० कोटी रक्कम शासनाच्या आमदार विशेष निधी अंतर्गत उपलब्ध होणार असून सदर निधी प्रभाग क्र. ३६ (भागशः) ३७ (पूर्ण) व ३८ (भागशः) आदर्श वॉर्ड तयार करण्यासाठी खर्च करण्यात यावी. निधी कमी पडल्यास महानगरपालिका निधीचा वापर करून सदर वॉर्ड आदर्श वॉर्ड तयार करण्यात यावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | अन्सेला मेन्डोंसा परेरा |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पाटील वंदना विकास |
| १० | जैन गिता भरत | १० | शबनम लियाकत शेख |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | प्रभात प्रकाश पाटील |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | झिनत रऊफ कुरेशी |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | विराणी रेखा अनिल |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | पुजारी कांचना शेखर |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | पिसाळ मनिषा नामदेव |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डिसा मर्लिन मर्विन |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | वंदना रामदास चक्रे |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | अनिता जयवंत पाटील |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | गोविंद हेलन जॉर्जी |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | काझी रशीदा जमील |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | बगाजी शर्मिला विल्सन |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | इनामदार जुबेर |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | वेतोसकर राजेश शंकर |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे |
| २६ | तारा विनायक घरत | २६ | सामंत प्रमोद जयराम |
| २७ | शुभांगी महिन कोटियन | ३७ | रकवी सुहास माधवराव |
| २८ | जयमाला किशोर पाटील | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार |
| २९ | परमार अनिता भरत | २९ | खण्डेलवाल सुरेश |
| ३० | पाटील प्रणाली संदिप | ३० | डॉ. आसिफ शेख |
| ३१ | गावंड मंदाकिणी आत्माराम | ३१ | लियाकत ग. शेख |
| ३२ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३२ | नरेश तुकाराम पाटील |
| ३३ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३३ | भोईर कमलेश यशवंत |
| ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३४ | रविंद्र भिमदेव माळी |
| ३५ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३५ | वंदना मंगेश पाटील |
| ३६ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३६ | अशोक तिवारी |
| ३७ | ठाकुर अरविंद७दत्ताराम | ३७ | म्हात्रे परशुराम पद्माकर |
| ३८ | शाह राकेश रतिशचंद्र | | |
| ३९ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | |
| ४० | केळुसकर प्रशांत नारायण | | |
| ४१ | भोईर भावना राजू | | |
| ४२ | जाधव मोहन महादेव | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | |
| ४४ | ॲड. रवि व्यास | | |
| ४५ | दिप्ती शेखर भट | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२२/०७/२०१५

**प्रकरण क्रमांक ( ६४ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात केंद्र शासन पुरस्कृत "स्मार्ट सिटी" व "अमृत योजना" (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पांची अंमलबजावणी करणेबाबत.

**ठराव क्रमांक ( ३७ )**

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून सदर शहर निवडण्यासाठी स्पर्धात्मक विहीत गुणांक तक्ता (स्कोअर कार्ड) भरून प्रवेश पत्र राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस स्मार्ट सिटी अंतर्गत पाच वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्षी रु.५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभा करावयाचा असून तसेच स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रती वर्ष रु.२०० कोटी इतका निधी खर्च करावयाचा आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी खालील निर्णय घेण्यात येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणून उभारु शकेल यासाठी नियोजन करावे व शासनास सादर करावे.

२) मिरा भाईंदर महानगरपालिका स्मार्ट सिटी अभियानातंर्गत ५ वर्षाच्या कालावधीसाठी प्रति वर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करू शकेल यासाठी कार्यक्षमतेचा व नियोजनाचा तपशिल तयार करून शासनास सादर करावा.

३) स्मार्ट सिटी अभियानातंर्गत नागरीकांचा सहभाग बाबतचे नियोजन करण्यात यावे.

४) सदर कामासाठी तांत्रिक कक्ष तयार करावा त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी / अधिकारी यांच्या जाहिरात प्रसिध्द करून नेमणूका कराव्यात.

५) सदर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करावी.

६) सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त ही सभा प्राधिकृत करत आहेत.

सदर स्मार्ट सिटी व अमृत योजना (Atal Mission for Rejuvenation and urban Transformation) हे प्रकल्प राबविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :-** श्री. रोहिदास पाटील

**अनुमोदन :-** श्री. दिनेश जैन

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC2/15-16/YJ/MT-2

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती दि.** २४/०८/२०१८

(म.न.पा. अ. अनुसूची ड प्रकरण २ कलम केअन्वये प्रस्ताव)

७०

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामीच्या निविदेस मंजुरी देणेबाबत. (Tender ID : 2018_MBMC_310035_1)**

**ठराव क्र. :** ६७

मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत ऑनलाईन निविदा, दोन मुदतवाढी व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदेमध्ये मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा. लि. तांत्रिकदृष्ट्या पात्र झाल्याने त्यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त दरांमध्ये दि. २१/०५/२०१८ रोजी वाटाघाटी करून खालील प्रमाणे दर निविदा काराने सादर केले आहेत.

**Financial Bid**

| Sr. No. | Description | Qty | Make & Model | Rate per Unit | Rates After Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3MP 30 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 80 | CP Plus (CP UNC-TA30L5S-V2) | 6965 | 6965 |
| 2 | 3MP 50 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | 45 | CP Plus (CP UNC-TB30FL6S-M-V2) | 9758 | 9758 |
| 3 | 1KM 5.8GHz wireless bridge outdoor type IP66 | 30 | Ubiquiti (M5-400) | 12151 | 12151 |
| 4 | Video Management Software with license for 150 cameras recording, viewing and playback capability as per tender specifications. | 1 | CP Plus (vOptimus Pro) | 487900 | 487900 |
| 5 | Network Video Server with keyboard, mouse, monitor, HDD storage hardware & required software, with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 1757696 | 1748000 |
| 6 | Client Work Station for Viewing with its accessories as per tender specifications. | 1 | HP/ Dell | 398250 | 397000 |
| 7 | Storage device having capacity to store 30 days recording of 150 cameras each of 3MP resolution at 25FPS | 1 | Synology / Netgear | 1959500 | 1957500 |
| 8 | 65" LED PROFESSIONAL SERIES HD MONITOR as per tender specifications. | 1 | Micromax / LG / Sony / Samsung | 137440 | 137440 |
| 9 | 24+4 PORT ETHERNET POE SWITCH with its accessories as per tender specifications. | 1 | Hi Focus / Dlink / Cisco | 38732 | 31000 |
| 10 | 8 port Giga PoE switch | 30 | Hi Focus | 7569 | 7569 |

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिका...
नगरसचिव विभाग

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | CAT 6e ETHERNET cable with necessary PVC Conduits, fixtures & junction box as required as per tender specifications. Supply of conduit, fixtures and junction boxes are in cope of vendor. | 3000 | Dlink | 215 | 215 |
| 12 | POLES FOR MOUNTING THE CAMERAS with its accessories as per tender specifications. | 80 | ISI Make | 7372 | 7372 |
| 13 | Outdoor weatherproof junction boxes pole mounted with MCB, POE injector, cameras power supply or POE source and surge protectors required for wireless antennas | 30 | ISI Make | 8762 | 8762 |
| 14 | Lightening arrestors on poles for protection | 80 | ISI Make | 4482 | 4482 |
| 15 | 21UX600MM WX800MM D RACK for Viewing Station with its accessories wheel etc. as per tender specifications. | 1 | ISI Make | 36046 | 36046 |
| 16 | Installation, Testing & Commissioning of the system. Laying & Termination of Power And Data Cables etc. | 1 | NA | 796500 | 792500 |
| 17 | Sector Antenna 5G, Gain 47dbi, or as per actual site requirement | 6 | Ubiquiti (AM-5G19DBI) | 23895 | 23895 |

**Final Total**

| Sr. No. | Particulars | Total Amount | Total After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका शांतीनगर येथील प्रभाग क्र. ३६ (भागशः), प्रभाग क्र. ३७ (पूर्ण), प्रभाग क्र. ३८ (भागशः) मध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे (श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना) | ९१,९९,५२४/- | ९१,७२,८४२/- |

**B. AMC for Adarsh Ward at MBMC**

| Sr. No. | Particulars | Total Amount in Figure (Rs.) | Rates After Negotiation |
|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Maintenance for Second Year (On Purchase Cost) | Rs. 919952/- | Rs. 917184/- |
| 2. | Comprehensive Maintenance for Third Year (On Purchase Cost) | Rs. 1379928/- | Rs. 1375776/- |
| **Grand total in Figures (T)** | | **Rs. 22998800/-** | **Rs. 2292960/-** |

वरील कामाकरीता "भारतरत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी आदर्श वॉर्ड योजना" अंतर्गत सन २०१७-१८ या वर्षात मा. महासभेने प्रस्ताव मंजूर केलेला होता. तथापि प्रत्यक्षात निविदा प्रक्रिया होऊन खर्च २०१७-१८ मध्ये झाला नाही. सदर लेखाशिर्षामध्ये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात फक्त रू. १० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१८-१९ यावर्षाच्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभागासाठी ठेवलेल्या "विकास कामांसाठी पुनर्विनियोजन" या लेखाशिर्षातील रू. ७०० लक्ष पैकी उपरोक्त कामासाठी रू. ९२ लक्ष इतका निधी पुनर्विनियोजन करणेस व उपरोक्त दरांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सूचक: श्री. सुरेश खंडेलवाल

अनुमोदक : श्री. प्रशांत दळवी

सभापती